" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

## स्वच्छता अभियान

मंगळवार दि.6 ऑगस्ट, 2024 रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक, संकल्पक शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या 37 व्या स्मृतिदिनानिमित्त संस्था व कॉलेज परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नवीन पिढीतील विद्यार्थ्यांना श्रमसंस्कार व श्रमप्रतिष्ठा यांचे धडे देण्यासाठी तसेच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी परिसरातील अनावश्यक तन काढणे, दगड गोटे एकत्र करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावणे तसेच वृक्षारोपणासाठी खड्डे तयार करणे, झाडाच्या अनावश्यक फांद्यांची छाटणी करणे, कचरा गोळा करणेइत्यादी कामे करवून घेतली गेली.

माननीय प्राचार्य डॉ.आर आर कुंभार व कॉलेजचे रजिस्टर श्री रघुनाथ जोग यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा स्वच्छता अभियान कार्यक्रम संपन्न झाला. द्वितीय वर्ष स्वयंसेवक व प्रथम वर्षातील निवड प्रक्रियेतील स्वयंसेवक यांच्या दोन तास झालेल्या श्रमदानातून भरघोस असे काम पूर्ण झाले.

8ऑगस्ट, 2024 रोजी संपन्न होणाऱ्या शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्रमदान अभियान आयोजित करून बापूजींच्या पवित्र कार्यास उजाळा घेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले

सदर श्रमदानामध्ये ज्युनिअर कॉलेज व सीनियर कॉलेज राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. श्रमदान अभियान प्रसंगी कार्यक्रम अधिकारी श्री एल एस नाकाडी, बागकाम माळी श्री कैलास भोसले, शिक्षकेतर कर्मचारी श्री सुरेश चरापले, श्री सर्जेराव खोत, राष्ट्रीय सेवा योजना सदस्य गवळी मॅडम, माने मॅडम, डॉ.अभिजीत पाटील, सुरजकुमार शिंदे इत्यादी उपस्थित होते.

सदर अभियान यशस्वीपणे पार पाडणेसाठी प्राचार्य डॉ.आर आर कुंभार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

श्री. एल. एस. नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# स्वच्छता अभियान

दि. 6.8.2024







